.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 20 ..
॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक २० ॥

॥ दशक विसावा : पूर्णनाम ॥ २०॥
समास पहिला : पूर्णापूर्णनिरूपण
॥ श्रीराम ॥
प्राणीव्यापक मन व्यापक । पृथ्वी व्यापक तेज व्यापक ।
वायो आकाश त्रिगुण व्यापक । अंतरात्मा मूळमाया ॥ १॥
निर्गुण ब्रह्म तें व्यापक । ऐसें अवघेंच व्यापक ।
तरी हें सगट किं काये येक । भेद आहे ॥ २॥
आत्मा आणि निरंजन । येणेंहि वाटतो अनुमान ।
आत्मा सगुण किं निर्गुण । आणि निरंजन ॥ ३॥
श्रोता संदेहीं पडिला । तेणें संदेह वाढला ।
अनुमान धरून बैसला । कोण तो कैसा ॥ ४॥
ऐका पहिली आशंका । अवघा गल्बला करूं नका ।
प्रगट करून विवेका । प्रत्यये पाहावा ॥ ५॥
शरीरपाडें सामर्थ्यपाडें । प्राणी व्याप करी निवाडें ।
परी पाहातां मनायेवढें । चपळ नाहीं ॥ ६॥
चपळपण येकदेसी । पूर्ण व्यापकता नव्हे त्यासी ।
पाहातां पृथ्वीच्या व्यापासी । सीमा आहे ॥ ७॥
तैसेंचि आप आणि तेज । अपूर्ण दिसती सहज ।
वायो चपळ समज । येकदेसी ॥ ८॥
गगन आणि निरंजन । तें पूर्ण व्यापक सघन ।
कोणीयेक अनुमान । तेथें असेचिना ॥ ९॥
त्रिगुण गुणक्षोभिणी माया । माईक जाईल विलया ।
अपूर्ण येकदेसी तया । पूर्ण व्यापकता न घडे ॥ १०॥
आत्मा आणि निरंजन । हें दोहिकडे नामाभिधान ।
अर्थान्वये समजोन । बोलणें करावें ॥ ११॥
आत्मा मन अत्यंत चपळ । तरी हें व्यापक नव्हेचि केवळ ।
सुचित अंतःकर्ण निवळ । करून पाहावें ॥ १२॥
अंतराळीं पाहातां पाताळी नाहीं । पाताळीं पाहातां अंतराळीं नाहीं ।
पूर्णपणें वसत नाहीं । चहुंकडे ॥ १३॥
पुढें पाहातां मागें नाहीं । मागें पाहातां पुढें नाहीं ।
वाम सव्य व्याप नाहीं । दशदिशा ॥ १४॥
चहुंकडे निशाणें मांडावीं । येकसरीं कैसीं सिवावीं ।
याकारणें समजोन उगवी । प्रत्ययें आपणासी ॥ १५॥
सूर्य आला प्रतिबिंबला । हाहि दृष्टांत न घडे वस्तुला ।
वस्तुरूप निर्गुणाला । म्हणिजेत आहे ॥ १६॥
घटाकाश मठकाश । हाहि दृष्टांत विशेष ।
तुळूं जातां निर्गुणास । साम्यता येते ॥ १७॥
ब्रह्मींचा अंश आकाश । आणी आत्म्याचा अंश मानस ।
दोहींचा अनुभव प्रत्ययास । येथें घ्यावा ॥ १८॥
गगन आणि हें मन । कैसे होती समान ।
मननसीळ महाजन । सकळहि जाणती ॥ १९॥
मन हें पुढें वावडे । मागें आवघेंचि रितें पडे ।
पूर्ण गगनास साम्यता घडे । कोण्या प्रकारें ॥ २०॥
परब्रह्मचि अचळ । आणि पर्वतासहि म्हणती अचळ ।
दोनीही येक केवळ । हें कैसें म्हणावें ॥ २१॥
ज्ञान विज्ञान विपरितज्ञान । तिनी कैसीं होती समान ।
याचा प्रत्ययो मनन । करून पाहावा ॥ २२॥
ज्ञान म्हणिजे जाणणें । अज्ञान म्हणिजे नेणणें ।
विपरितज्ञान म्हणिजे देखणें । येकाचें येक ॥ २३॥
जाणणें नेणणें वेगळें केलें । ढोबळें पंचभूतिक उरलें ।
विपरीतज्ञान समजलें । पाहिजे जीवीं ॥ २४॥
द्रष्टा साक्षी अंतरात्मा । जीवात्माची होये शिवात्मा ।
पुढें शिवात्मा तोचि जीवात्मा । जन्म घेतो ॥ २५॥
आत्मत्वीं जन्ममरण लागे । आत्मत्वीं जन्ममरण न भंगे ।
संभवामि युगे युगे । ऐसे हें वचन ॥ २६॥
जीव येकदेसी नर । विचारें जाला विश्वंभर ।
विश्वंभरास संसार । चुकेना कीं ॥ २७॥
ज्ञान आणि अज्ञान । वृत्तिरूपें हें समान ।
निवृत्तिरूपें विज्ञान । जालें पाहिजे ॥ २८॥
ज्ञानें येवढें ब्रह्मांड केलें । ज्ञानें येवढें वाढविलें ।
नाना विकाराचें वळलें । तें हें ज्ञान ॥ २९॥
आठवें देह ब्रह्मांडीचें । तें हें ज्ञान साचें ।
विज्ञानरूप विदेहाचें । पद पाविजे ॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
पूर्णापूर्णनिरूपणनाम समास पहिला ॥ १॥ २०.१

समास दुसरा : सृष्टीत्रिविधलक्षणनिरूपण
॥ श्रीराम ॥
मूळमाया नस्तां चंचळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ ।
जैसें गगन अंतराळ । चहुंकडे ॥ १॥
दृश्य आलें आणि गेलें । परी तें ब्रह्म संचलें ।
जैसें गगन कोंदाटलें । चहुंकडे ॥ २॥
जिकडे पाहावें तिकडे अपार । कोणेकडे नाहीं पार ।
येकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाहीं ॥ ३॥
ब्रह्मांडावरतें बैसावें । अवकाश भकास अवलोकावें ।

तेथें चंचळ व्यापकाच्या नांवें । सुन्याकार ॥ ४॥
दृश्य विवेकें काढिलें । मग परब्रह्म कोंदाटलें ।
कोणासीच अनुमानलें । नाहीं कदा ॥ ५॥
अधोर्ध पाहातां चहुंकडे । निर्गुण ब्रह्म जिकडे तिकडे ।
मन धांवेल कोणेकडे । अंत पाहावया ॥ ६॥
दृश्य चळे ब्रह्म चळेना । दृश्य कळे ब्रह्म कळेना ।
दृश्य आकळे ब्रह्म आकळेना । कल्पनेसी ॥ ७॥
कल्पना म्हणिजे कांहींच नाहीं । ब्रह्म दाटले ठाईचा ठाई ।
वाक्यार्थ विवरत जाई । म्हणिजे बरें ॥ ८॥
परब्रह्मायेवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं ।
कळल्याविण कांहींच नाहीं । समाधान ॥ ९॥
पिप्लीकामार्गें हळु हळु घडे । विहंगमें फळासी गांठी पडे ।
साधक मननीं पवाडे । म्हणिजे बरें ॥ १०॥
परब्रह्मासारिखें दुसरें । कांहींच नाहीं खरें ।
निंदा आणि स्तुतिउत्तरें । परब्रह्मीं नाहीं ॥ ११॥
ऐसे परब्रह्म येकजिनसी । कांहीं तुळेना तयासी ।
मानुभव पुण्यरासी । तेथें पवाडती ॥ १२॥
चंचळें होते दुःखप्राप्ती । निश्चळायेवडी नाहीं विश्रांती ।
निश्चळ प्रत्ययें पाहाती । माहानुभाव ॥ १३॥
मुळापासून शेवटवरी । विचारणा केलीच करी ।
प्रत्ययाचा निश्चयो अंतरीं । तयासीच फावे ॥ १४॥
कल्पनेचि सृष्टी जाली । त्रिविध प्रकारें भासली ।
तिक्षण बुद्धीनें आणिली । पाहिजे मना ॥ १५॥
मूळमायेपासून त्रिगुण । अवघें येकदेसी लक्षण ।
पांचा भूतांचा ढोबळा गुण । दिसत आहे ॥ १६॥
पृथ्वीपासून च्यारी खाणी । चत्वार वेगळाली करणी ।
सकळ सृष्टीचि चाली येथुनी । पुढें नाहीं ॥ १७॥
सृष्टीचें विविध लक्षण । विशद करूं निरूपण ।
श्रोतीं सुचित अंतःकर्ण । केलें पाहिजे ॥ १८॥
मूळमाया जाणीवेची । मुळीं सूक्ष्म कल्पनेची ।
जैसी स्थिती परे वाचेची । तद्रूपचि ते ॥ १९॥
अष्टधा प्रकृतीचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ ।
सूक्ष्मरूप बीज सकळ । मुळींच आहे ॥ २०॥
जड पदार्थ चेतवितें तें । म्हणौन चैतन्य बोलिजेतें ।
सूक्ष्म रूपें संकेतें । समजोन घ्यावीं ॥ २१॥
प्रकृती पुरुषाचा विचार । अर्धनारीनटेश्वर ।
अष्टधा प्रकृतीचा विचार । सकळ कांहीं ॥ २२॥
गुप्त त्रिगुणाचें गूढत्व । म्हणौन संकेत महत्तत्व ।
गुप्तरूपें शुद्धसत्व । तेथेंचि वसे ॥ २३॥
जेथून गुण प्रगटती । तीस गुणक्षोभिणी म्हणती ।
त्रिगुणाचीं रूपें समजती । धन्य ते साधु ॥ २४॥
गुप्तरूपें गुणसौम्य । म्हणौनि बोलिजे गुणसाम्य ।
सूक्ष्म संकेत अगम्य । बहुतांस कैंचा ॥ २५॥
मूळमायेपासून त्रिगुण । चंचळ येकदेसी लक्षण ।
प्रत्ययें पाहातां खूण । अंतरीं येते ॥ २६॥
पुढें पंचभूतांचीं बंडें । वाढलीं विशाळें उदंडें ।
सप्तद्वीपें नवखंडें । वसुंधरा हे ॥ २७॥
त्रिगुणापासून पृथ्वीवरी । दुसऱ्या जिनसान्याची परी ।
दोनी जिनस याउपरी । तिसरा ऐका ॥ २८॥
पृथ्वी नाना जिनसाचें बीज । अंडज जारज श्वेतज उद्भिज ।
च्यारी खाणी च्यारी वाणी सहज । निर्माण जाल्या ॥ २९॥
खाणी वाणी होती जाती । परंतु तैसीच आहे जगती ।
ऐसे होती आणी जाती । उदंड प्राणी ॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सृष्टीत्रिविधलक्षणनिरूपणनाम समास दुसरा ॥ २॥ २०.२

समास तिसरा : सूक्ष्मनामाभिधाननिरूपण

॥ श्रीराम ॥

मुळींहून सेवटवरी । विस्तार बोलिला नानापरी ।
पुन्हा विवरत विरत माघारी । वृत्ति न्यावी ॥ १॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी ।
नाना प्रकारीचे प्राणी । जन्मास येती ॥ २॥
अवघे होती पृथ्वीपासूनी । पृथ्वीमधें जाती नासोनी ।
अनेक येती जाती परी अवनी । तैसीच आहे ॥ ३॥
ऐसें हें सेंद्याकडिल खांड । दुसरें भूतांचें बंड ।
तिसरें नामाभिधानें उदंड । सूक्ष्मरूपें ॥ ४॥
स्थूळ अवघें सांडून द्यावें । सूक्ष्मरूपें वोळखावें ।
गुणापासून पाहिलेच पाहावें । सूक्ष्मदृष्टीं ॥ ५॥
गुणाचीं रूपें जाणिव नेणीव । पाहिलाच पाहावा अभिप्राव ।
सूक्ष्मदृष्टीचें लाघव । येथून पुढें ॥ ६॥
शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्त्वगुण ।
जाणीवनेणीव रजोगुण । मिश्रित चालिला ॥ ७॥
त्रिगुणाचीं रूपें ऐसीं । कळों लागलीं अपैसीं ।
गुणापुढील कर्दमासी । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८॥
रज तम आणि सत्व । तिहींचें जेथें गूढत्व ।
तें जाणिजे महत्तत्व । कर्दमरूप ॥ ९॥
प्रकृती पुरुष शिवशक्ति । अर्धनारीनटेश्वर म्हणती ।
परी याची स्वरूपस्थिती । कर्दमरूप ॥ १०॥
सूक्ष्मरूपें गुणसौम्य । त्यास बोलिजे गुणसाम्य ।
तैसेंचि चैतन्य अगम्य । सूक्ष्मरूपी ॥ ११॥
बहुजिनसी मूळमाया । माहांकारण ब्रह्मांडीची काया ।
ऐसिया सूक्ष्म अन्वया । पाहिलेंचि पाहावें ॥ १२॥
च्यारी खाणी पांच भूतें । चौदा सूक्ष्म संकेतें ।
काये पाहाणें तें येथें । शोधून पाहावें ॥ १३॥
आहाच पाहातां कळेना । गरज केल्यां समजेना ।
नाना प्रकारीं जनाच्या मना । संदेह पडती ॥ १४॥
चौदा पांच येकोणीस । येकोणीस च्यारी तेविस ।

यांमधें मूळ चतुर्दश । पाहिलेंचि पाहावें ॥ १५ ॥
जो विवरोन समजला । तेथें संदेह नाहीं उरला ।
समजल्याविण जो गल्बला । तो निरर्थक ॥ १६ ॥
सकळ सृष्टीचें बीज । मूळमायेंत असे सहज ।
अवघें समजतां सज्ज । परमार्थ होतो ॥ १७ ॥
समजलें माणूस चावळेना । निश्चइ अनुमान धरीना ।
सावळगोंदा करीना । परमार्थ कदा ॥ १८ ॥
शब्दातीत बोलतां आलें । त्यास वाच्यांश बोलिलें ।
शुद्ध लक्ष्यांश लक्षिलें । पाहिजे विवेकें ॥ १९ ॥
पूर्वपक्ष म्हणिजे माया । सिद्धांतें जाये विलया ।
माया नस्तां मग तया । काये म्हणावें ॥ २० ॥
अन्वये आणी वीतरेक । हा पूर्वपक्षाचा विवेक ।
सिद्धांत म्हणिजे शुद्ध येक । दुसरें नाहीं ॥ २१ ॥
अधोमुखें भेद वाढतो । ऊर्धमुखें भेद तुटतो ।
निःसंगपणें निर्गुणी तो । माहांयोगी ॥ २२ ॥
माया मिथ्या ऐसी कळली । तरी मग भीड कां लागली ।
मायेचें भिडेनें घसरली । स्वरूपस्थिती ॥ २३ ॥
लटके मायेनें दपटावें । सत्य परब्रह्म सांडावें ।
मुख्य निश्चयें हिंडावें । कासयासी ॥ २४ ॥
पृथ्वीमधें बहुत जन । त्यामधें असती सज्जन ।
परी साधूस वोळखतो कोण । साधुवेगळा ॥ २५ ॥
म्हणौन संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा ।
फिरफिरों ठाइं पाडावा । साधुजन ॥ २६ ॥
उदंड हुडकावे संत । सांपडे प्रचितीचा महंत ।
प्रचितीविण स्वहित । होणार नाहीं ॥ २७ ॥
प्रपंच अथवा परमार्थ । प्रचितीविण अवघें वेर्थ ।
प्रत्ययेज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ॥ २८ ॥
रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ ।
परलोकींच निजस्वार्थ । तेथेंचि घडे ॥ २९ ॥
म्हणौन पाहिलेंचि पाहावें । आणि शोधिलेंचि शोधावें ।
अवघें कळतां स्वभावें । संदेह तुटती ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सूक्ष्मनामाभिधाननिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ २०.३

समास चौथा : आत्मानिरूपण

॥ श्रीराम ॥

सकळ जनास प्रार्थना । उगेंच उदास करावेंना ।
निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें ॥ १ ॥
प्रत्यये राहिला येकेकडे । आपण धांवतो भलतेकडे ।
तरी सारासाराचे निवाडे । कैसे होती ॥ २ ॥
उगिच पाहातां सृष्टी । गल्बला दिसतो दृष्टीं ।
परी ते राजसत्तेची गोष्टी । वेगळीच ॥ ३ ॥
पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें ।
नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ॥ ४ ॥
त्याचा महिमा कळेल कोणाला । माता वांटून कृपाळु जाला ।
प्रत्यक्ष जगदीश जगाला । रक्षितसे ॥ ५ ॥
सत्ता पृथ्वीमधें वांटली । जेथें तेथें विभागली ।
कळेनें सृष्टि चालिली । भगवंताचे ॥ ६ ॥
मूळ जाणत्या पुरुषाची सत्ता । शरीरीं विभागली तत्वता ।
सकळ कळा चातुर्यता । तेथें वसे ॥ ७ ॥
सकळ पुराचा ईश । जगामध्यें तो जगदीश ।
नाना शरीरीं सावकास । करूं लागे ॥ ८ ॥
पाहातां सृष्टिची रचना । ते येकाचेन चालेना ।
येकचि चालवी नाना । देह धरुनी ॥ ९ ॥
नाहीं उंच नीच विचारिलें । नाहीं बरें वाईट पाहिलें ।
कार्ये चालों ऐसें जालें । भगवंतासी ॥ १० ॥
किंवा नेणणें आडवें केलें । किंवा अभ्यासीं घातलें ।
हें कैसें कैसें केलें । त्याचा तोचि जाणे ॥ ११ ॥
जगदांतरीं अनुसंधान । बरें पाहाणें हेंचि ध्यान ।
ध्यान आणी तें ज्ञान । येकरूप ॥ १२ ॥
प्राणी संसारास आला । कांहीं येक शाहाणा जाला ।
मग तो विवरों लागला । भूमंडळीं ॥ १३ ॥
प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन ।
विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ॥ १४ ॥
उपासना धुंडुन वासना धरिली । तरी ते लांबतचि गेली ।
महिमा न कळे बोलिली । येथार्थ आहे ॥ १५ ॥
द्रष्टा म्हणिजे पाहाता । साक्षी म्हणिजे जाणता ।
अनंतरूपी अनंता । वोळखावें ॥ १६ ॥
संगती असावी भल्यांची । धाटी कथा निरूपणाची ।
कांहीं येक मनाची । विश्रांती आहे ॥ १७ ॥
त्याहिमधें प्रत्ययेज्ञान । जाळून टाकिला अनुमान ।
प्रचितीविण समाधान । पाविजेल कैंचें ॥ १८ ॥
मूळसंकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप ।
जगदांतरीं तेंचि रूप । देखिजेतें ॥ १९ ॥
उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानीं चौथा देह आरोप ।
याकारणें सर्व संकल्प । सोडून द्यावा ॥ २० ॥
पुढें परब्रह्म विशाळ । गगनासारिखें पोकळ ।
घन पातळ कोमळ । काये म्हणावें ॥ २१ ॥
उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन ।
योगियांचें समाधान । येणें रितीं ॥ २२ ॥
विचार नेहटूनसा पाहे । तरी उपासना आपणचि आहे ।
येक जाये येक आहे । देह धरुनी ॥ २३ ॥
अखंड ऐसी घालमेली । पूर्वापार होत गेली ।
आतां हि तैसीच चालिली । उत्पत्ति स्थिती ॥ २४ ॥
बनावरी बनचरांची सत्ता । जळावरी जळचरांची सत्ता ।
भूमंडळीं भूपाळां समस्तां । येणेंचि न्यायें ॥ २५ ॥
सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें ।

परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २६ ॥
कर्ता जगदीश हें तों खरें । परी विभाग आला पृथकाकारें ।
तेथें अहंतेचें काविरें । बाधिजेना ॥ २७ ॥
हरिर्दाता हरिर्भोक्ता । ऐसें चालतें तत्वता ।
ये गोष्टीचा आतां । विचार पाहावा ॥ २८ ॥
सकळ कर्ता परमेश्वरु । आपला माइक विचारु ।
जैसें कळेल तैसें करूं । जगदांतरें ॥ २९ ॥
देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं ।
पाइरी चढोन पाहीं । मूळपरियंत ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मानिरूपणनाम समास चौथा ॥ ४ ॥ २०.४

समास पांचवा : चत्वारजिन्नसनिरूपण

॥ श्रीराम ॥

येथून पाहातां तेथवरी । चत्वार जीनस अवधारीं ।
येक चौदा पांच च्यारी । ऐसें आहे ॥ १ ॥
परब्रह्म सकळांहून वेगळें । परब्रह्म सकळांहून आगळें ।
नाना कल्पनेनिराळें । परब्रह्म तें ॥ २ ॥
परब्रह्माचा विचार । नाना कल्पनेहून पर ।
निर्मळ निश्चळ निर्विकार । अखंड आहे ॥ ३ ॥
परब्रह्मास कांहींच तुळेना । हा येक मुख्य जिनसाना ।
दुसरा जिनस नाना कल्पना । मूळमाया ॥ ४ ॥
नाना सूक्ष्मरूप । सूक्ष्म आणी कर्दमरूप ।
मुळींच्या संकल्पाचा आरोप । मूळमाया ॥ ५ ॥
हरिसंकल्प मुळींचा । आत्माराम सकळांचा ।
संकेत नामाभिधानाचा । येणें प्रकारें ॥ ६ ॥
निश्चळीं चंचळ चेतलें । म्हणौनि चैतन्य बोलिलें ।
गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ॥ ७ ॥
अर्धनारीनटेश्वर । तोचि शड्गुणैश्वर ।
प्रकृतिपुरुषाचा विचार । शिवशक्ती ॥ ८ ॥
सुद्धसत्वगुणाची मांडणी । अर्धमात्रा गुणक्षोभिणी ।
पुढें तिही गुणांची करणी । प्रगट जाली ॥ ९ ॥
मन माया अंतरात्मा । चौदा जिनसांची सीमा ।
विद्यमान ज्ञानात्मा । इतुके ठाइं ॥ १० ॥
ऐसा दुसरा जिनस । अभिधानें चतुर्दश ।
आतां तिसरा जिनस । पंचमाहाभूतें ॥ ११ ॥
येथें पाहातां जाणीव थोडी । आदिअंत हे रोकडी ।
खाणी निरोपिल्या तांतडी । तो चौथा जिनस ॥ १२ ॥
च्यारी खाणी अनंत प्राणी । जाणीवेची जाली दाटणी ।
च्यारी जिनस येथूनी । संपूर्ण जाले ॥ १३ ॥
बीज थोडें पेरिजेतें । पुढें त्याचें उदंड होतें ।
तैसें जालें आत्मयातें । खाणी वाणी प्रगटतां ॥ १४ ॥
ऐसी सत्ता प्रबळली । थोडे सत्तेचि उदंड जाली ।
मनुष्यवेषें सृष्टी भोगिली । नाना प्रकारें ॥ १५ ॥
प्राणी मारून स्वापद पळे । वरकड त्यास काये कळे ।
नाना भोग तो निवळे । मनुष्यदेहीं ॥ १६ ॥
नाना शब्द नाना स्पर्श । नाना रूप नाना रस ।
नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥ १७ ॥
अमोल्य रत्नें नाना वस्त्रें । नाना यानें नाना शस्त्रें ।
नाना विद्या कळा शास्त्रें । नरदेह जाणे ॥ १८ ॥
पृथ्वी सत्तेनें व्यापिली । स्थळोस्थळीं आटोपिली ।
नाना विद्या कळा केली । नाना धारणा ॥ १९ ॥
दृश्य अवघेंचि पाहावें । स्थानमान सांभाळावें ।
सारासार विचारावें । नरदेहे जालियां ॥ २० ॥
येहलोक आणी परलोक । नाना प्रकारींचा विवेक ।
विवेक आणी अविवेक । मनुष्य जाणे ॥ २१ ॥
नाना पिंडीं ब्रह्मांडरचना । नाना मुळींची कल्पना ।
नाना प्रकारीं धारणा । मनुष्य जाणे ॥ २२ ॥
अष्टभोग नवरस । नाना प्रकारींचा विळास ।
वाच्यांश लक्ष्यांश सारांश । मनुष्य जाणे ॥ २३ ॥
मनुष्यें सकळांस आळिलें । त्या मनुष्यास देवें पाळिलें ।
ऐसें हें अवघें कळलें । नरदेहयोगें ॥ २४ ॥
नरदेह परम दुल्लभ । येणें घडे अलभ्य लाभ ।
दुल्लभ तें सुल्लभ । होत आहे ॥ २५ ॥
बरकड देहे हें काबाड । नरदेह मोठें घबाड ।
परंतु पाहिजे जाड । विवेकरचना ॥ २६ ॥
येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला ।
देव नाहीं वोळखिला । विवेकबळें ॥ २७ ॥
नर तोचि नारायेण । जरी प्रत्ययें करी श्रवण ।
मननशीळ अंतःकर्ण । सर्वकाळ ॥ २८ ॥
जेणें स्वयेंचि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें ।
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ २९ ॥
सकळ शोधून राहिला । संदेह कैचा तयाला ।
पुढें विचार कैसा जाला । त्याचा तोचि जाणे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
चत्वारजिनसनाम समास पांचवा ॥ ५ ॥ २०.५

समास सहावा : आत्मागुणनिरूपण

॥ श्रीराम ॥

पाहों जातां भूमंडळ । ठाई ठाई आहे जळ ।
कित्तेक तें निर्मळ माळ । जळेंविण पृथ्वी ॥ १ ॥
तैसें दृश्य विस्तारलें । कांहींयेक जाणिवेनें शोभलें ।
जाणीवरहित उरलें । कीतीयेक दृश्य ॥ २ ॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी ।
शास्त्रीं अवघें नेमुनी । बोलिलें असे ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

जलजा नवलक्षाश्च दशलक्षाश्च पक्षिणः ।

कृमयो रुद्रलक्षाश्च विंशल्लक्षा गवादयः ॥
स्थावरा स्त्रिंशल्लक्षाश्च चतुर्लक्षाश्च मानवाः ।
पापपुण्यं समं कृत्वा नरयोनिषु जायते ॥

मनुष्यें च्यारी लक्ष । पशु वीस लक्ष ।
क्रिम आक्रा लक्ष । बोलिलें शास्त्रीं ॥ ४ ॥
दाहा लक्ष ते खेचर । नव लक्ष जळचर ।
तीस लक्ष स्थावर । बोलिलें शास्त्रीं ॥ ५ ॥
ऐसी चौऱ्यासी लक्ष योनी । जितुका तितुका जाणता प्राणी ।
अनंत देह्याची मांडणी । मर्यादा कैंची ॥ ६ ॥
अनंत प्राणी होत जाती । त्यांचें अधिष्ठान जगती ।
जगतीवेगळी स्थिती । त्यास कैंची ॥ ७ ॥
पुढें पाहातां पंचभूतें । पावलीं पष्टदशेतें ।
कोणी विद्यमान कोणी तें । उगीच असती ॥ ८ ॥
अंतरात्म्याची वोळखण । तेचि जेथें चपळपण ।
जाणीवेचें अधिष्ठान । सावध ऐका ॥ ९ ॥
सुखदुख जाणता जीव । तैसाचि जाणावा सद शिव ।
अंतःकर्णपंचक अपूर्व । अंश आत्मयाचा ॥ १० ॥
स्थुळीं आकाशाचे गुण । अंश आत्मयाचे जाण ।
सत्व रज तमोगुण । गुण आत्मयाचे ॥ ११ ॥
नाना चाळणा नाना धृती । नवविधा भक्ति चतुर्विधा मुक्ती ।
अलिप्तपण सहजस्थिती । गुण आत्मयाचे ॥ १२ ॥
द्रष्टा साक्षी ज्ञानघन । सत्ता चैतन्य पुरातन ।
श्रवण मनन विवरण । गुण आत्मयाचे ॥ १३ ॥
दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ध्यान ।
ज्ञेय ज्ञाता ज्ञान । गुण आत्मयाचे ॥ १४ ॥
वेदशास्त्रपुराणअर्थ । गुप्त चालिला परमार्थ ।
सर्वज्ञपणें समर्थ । गुण आत्मयाचे ॥ १५ ॥
बद्ध मुमुक्षु साधक सिद्ध । विचार पाहाणें शुद्ध ।
बोध आणी प्रबोध । गुण आत्मयाचे ॥ १६ ॥
जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या । प्रकृतिपुरुष मूळमाया ।
पिंड ब्रह्मांड अष्टकाया । गुण आत्मयाचे ॥ १७ ॥
परमात्मा आणी परमेश्वरी । जगदात्मा आणी जगदेश्वरी ।
महेश आणी माहेश्वरी । गुण आत्मयाचे ॥ १८ ॥
सूक्ष्म जितुकें नामरूप । तितुकें आत्मयाचें स्वरूप ।
संकेतनामाभिधानें अमूप । सीमा नाहीं ॥ १९ ॥
आदिशक्ती शिवशक्ती । मुख्य मूळमाया सर्वशक्ती ।
नाना जीनस उत्पती स्थिती । तितुके गुण आत्मयाचे ॥ २० ॥
पूर्वपक्ष आणी सिद्धांत । गाणें वाजवणें संगीत ।
नाना विद्या अद्भुत । गुण आत्मयाचे ॥ २१ ॥
ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । असद्वृति सद्वृति जाण ।
ज्ञेप्तिमात्र अलिप्तपण । गुण आत्मयाचे ॥ २२ ॥
पिंड ब्रह्मांड तत्वझाडा । नाना तत्वांचा निवाडा ।
विचार पाहाणें उघडा । गुण आत्मयाचे ॥ २३ ॥
नाना ध्यानें अनुसंधानें । नाना स्थिति नाना ज्ञानें ।
अनन्य आत्मनिवेदनें । गुण आत्मयाचे ॥ २४ ॥
तेतीस कोटी सुरवर । आठ्यासी सहश्र ऋषेश्वर ।
भूत खेचर अपार । गुण आत्मयाचे ॥ २५ ॥
भूतावळी औट कोटी । च्यामुंडा छपन्न कोटी ।
कात्यायेणी नव कोटी । गुण आत्मयाचे ॥ २६ ॥
चंद्र सूर्य तारामंडळें । नाना नक्षत्रें ग्रहमंडळें ।
शेष कूर्म मेघमंडळें । गुण आत्मयाचे ॥ २७ ॥
देव दानव मानव । नाना प्रकारीचे जीव ।
पाहातां सकळ भावाभाव । गुण आत्मयाचे ॥ २८ ॥
आत्मयाचे नाना गुण । ब्रह्म निर्विकार निर्गुण ।
जाणणें येकदेसी पूर्ण । गुण आत्मयाचे ॥ २९ ॥
आत्मरामउपासना । तेणें पावले निरंजना ।
निसंदेहे अनुष्ठना । ठावचि नाहीं ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मागुणनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥ २०.६

समास सातवा : आत्मानिरूपण

॥ श्रीराम ॥

अनुर्वाच्य समाधान जालें । तें पाहिजे बोलिलें ।
बोलिल्यासाठीं समाधान गेलें । हें तों घडेना ॥ १ ॥
कांहीं सांडावें लागत नाहीं । कांहीं मांडावें लागत नाहीं ।
येक विचार शोधून पाहीं । म्हणिजे कळे ॥ २ ॥
मुख्य कासीविश्वेश्वर । श्वेतबंद रामेश्वर ।
मलकार्जुन भीमाशंकर । गुण आत्मयाचे ॥ ३ ॥
जैसीं मुख्य बारा लिंगें । यावेगळीं अनंत लिंगें ।
प्रचित जाणिजेत जगें । गुण आत्मयाचे ॥ ४ ॥
भूमंडळीं अनंत शक्ति । नाना साक्षात्कार चमत्कार होती ।
नाना देवांच्या सामर्थ्यमूर्ती । गुण आत्मयाचे ॥ ५ ॥
नाना सिद्धांचीं सामर्थ्यें । नाना मंत्रांचीं सामर्थ्यें ।
नानामोहरेवल्लींत सामर्थ्यें । गुण आत्मयाचे ॥ ६ ॥
नाना तीर्थांचीं सामर्थ्यें । नाना क्षेत्रांचीं सामर्थ्यें ।
नाना भूमंडळीं सामर्थ्यें । गुण आत्मयाचे ॥ ७ ॥
जितुके कांहीं उत्तम गुण । तितुकें आत्मयाचें लक्षण ।
बरें वाईट तितुकें जाण । आत्म्याचकरितां ॥ ८ ॥
शुद्ध आत्मा उत्तम गुणी । सबळ आत्मा अवलक्षणी ।
बरी वाईट आवघी करणी । आत्मयाची ॥ ९ ॥
नाना साभिमान धरणें । नाना प्रतिसृष्टी करणें ।
नाना श्रापउश्रापलक्षणें आत्मयाचेनी ॥ १० ॥
पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्वांचा पिंड शोधावा ।
तत्वें शोधितां पिंड आघवा । कळों येतो ॥ ११ ॥
जड देह भूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा ।
निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैचा । जेथें तेथें ॥ १२ ॥

निश्चळ चंचळ आणी जड । पिंडीं करावा निवाड ।
प्रत्ययवेगळें जाड । बोलणें नाहीं ॥ १३ ॥
पिंडामधून आत्मा जातो । तेव्हां निवाडा कळों येतो ।
देहे जड हा पडतो । देखतदेखतां ॥ १४ ॥
जड तितुकें पडिलें । चंचळ तितुकें निघोनी गेलें ।
जडचंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ॥ १५ ॥
निश्चळ आहे सकळां ठाईं । हें तों पाहाणें नलगे कांहीं ।
गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ॥ १६ ॥
जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड ।
जड चंचळ जातां जाड । परब्रह्मचि आहे ॥ १७ ॥
माहांभूतांचा खंबीर केला । आत्मा घालून पुतळा जाला ।
चालिला सृष्टीचा गल्बला । येणें रितीं ॥ १८ ॥
आत्मा माया विकार करी । आळ घालिती ब्रह्मावरी ।
प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तोचि भला ॥ १९ ॥
ब्रह्म व्यापक अखंड । वरकड व्यापकता खंड ।
शोधून पाहातां जड । कांहींच नाहीं ॥ २० ॥
गगनासी खंडता नये । गगनाचें नासेल काये ।
जरी जाला माहांप्रळये । सृष्टीसंव्हार ॥ २१ ॥
जें संव्हारामध्यें सापडले । तें सहजचि नासिवंत जालें ।
जाणते लोकीं उगविलें । पाहिजे कोडें ॥ २२ ॥
न कळतां वाटे कोडें । कळतां आवघें दिसें उघडें ।
म्हणोनी येकांतीं निवाडे । विचार पाहावा ॥ २३ ॥
मिळता प्रत्ययाचे संत । येकांपरीस येकांत ।
केली पाहिजे सावचित । नाना चर्चा ॥ २४ ॥
पाहिल्यावेगळें कळत नाहीं । कळतां कळतां संदेह नाहीं ।
विवेक पाहातां कोठेंचि नाहीं । मायाजाळ ॥ २५ ॥
गगनीं आभाळ आलें । मागुती सवेंचि उडालें ।
आत्म्याकरितां दृश्य जालें । उडेल तैसें ॥ २६ ॥
मुळापासून सेवटवरी । विवेकी विवेकें विवरी ।
तोचि निश्चय थावरी । चळेना ऐसा ॥ २७ ॥
वरकड निश्चय अनुमानाचे । अनुमानें बोलतां काये वेंचे ।
जाणते पुरुष प्रचितीचे । ते तों मानीतना ॥ २८ ॥
उगेंच बोलणें अनुमानाचें । अनुमानाचें कोण्या कामाचें ।
येथें सगट विचाराचें । काम नाहीं ॥ २९ ॥
सगट विचार तो अविचार । कित्येक म्हणती येकंकार ।
येकंकार भ्रष्टाकार । करूं नये ॥ ३० ॥
कृत्रिम अवघें सांडावें । कांहीं येक शुद्ध घ्यावें ।
जाणजाणों निवडावें । सारासार ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मानिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ २०.७

समास आठवा : देहेक्षेत्रनिरूपण

॥ श्रीराम ॥

विधीप्रपंचतरु वाढला । वाढतां वाढतां विस्तीर्ण जाला ।
फळें येतां विश्रांती पावला । बहुत प्राणी ॥ १ ॥
नाना फळें रसाळें लागलीं । नाना जिनसी गोडीस आलीं ।
गोडी पाहावया निर्माण केलीं । नाना शरीरें ॥ २ ॥
निर्माण जाले उत्तम विषये । शरीरेंविण भोगितां नये ।
म्हणोनी निर्मिला उपाये । नाना शरीरें ॥ ३ ॥
ज्ञानइंद्रियें निर्माण केलीं । भिन्न भिन्न गुणांचीं निर्मिलीं ।
येका शरीरासी लागलीं । परी वेगळालीं ॥ ४ ॥
श्रोत्रइंद्रिंई शब्द पडिला । त्याचा भेद पाहिजे कळला ।
ऐसा उपाये निर्माण केला । इंद्रियांमधें ॥ ५ ॥
त्वचेइंद्रियें सीतोष्ण भासे । चक्षुइंद्रियें सकळ दिसे ।
इंद्रियांमधें गुण ऐसे । वेगळाले ॥ ६ ॥
जिव्हेमधें रस चाखणें । घ्राणामधें परिमळ घेणें ।
इंद्रियांमधें वेगळाल्या गुणें । भेद केले ॥ ७ ॥
वायोपंचकीं अंतःकर्णपंचक । मिसळोनि फिरे निशंक ।
ज्ञानइंद्रियें कर्मइंद्रियें सकळिक । सावकास पाहे ॥ ८ ॥
कर्मइंद्रियें लागवेगीं । जीव भोगीं विषयांलागीं ।
ऐसा हा उपाये जगीं । ईश्वरें केला ॥ ९ ॥
निषय निर्माण जाले बरवे । शरीरेंविण कैसें भोगावे ।
नाना शरीराचे गोवे । याकारणें ॥ १० ॥
अस्तीमांशाचे शरीर । त्यामधें गुणप्रकार ।
शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ॥ ११ ॥
ऐसीं शरीरें निर्माण केलीं । विषयभोगें वाढविलीं ।
लाहानथोर निर्माण जालीं । येणें प्रकारें ॥ १२ ॥
अस्तीमांशांचीं शरीरें । निर्माण केली जगदेश्वरें ।
विवेकें गुणविचारें । करूनियां ॥ १३ ॥
अस्तिमौंशाचा पुतळा । जेणें ज्ञानें सकळ कळा ।
शरीरभेद वेगळा । ठाईं ठाईं ॥ १४ ॥
तो भेद कार्याकारण । त्याचा उदंड आहे गुण ।
सकळ तीक्ष्ण बुद्धीविण । काये कळे ॥ १५ ॥
सकळ करणें ईश्वराला । म्हणोनी भेद निर्माण जाला ।
ऊर्धमुख होतां भेदाला । ठाव कैंचा ॥ १६ ॥
सृष्टिकर्णीं आगत्य भेद । संव्हारें सहजचि अभेद ।
भेद अभेद हा संवाद । मायागुणें ॥ १७ ॥
मायेमधें अंतरात्मा । नकळे तयाचा महिमा ।
जाला चतुर्मुख ब्रह्मा । तोहि संदेहीं पडे ॥ १८ ॥
पीळ पेंच कडोविकडीं । तर्क तीक्षण घडीनें घडी ।
मनासी होये तांतडी । विवरण करितां ॥ १९ ॥
आत्मत्वें लागतें सकळ कांहीं । निरंजनीं हे कांहींच नाहीं ।
येकांतकाळीं समजोन पाहीं । म्हणिजे बरें ॥ २० ॥
देहे सामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर ।
थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती ॥ २१ ॥
शेष कूर्म वऱ्हाव जाले । येवढे देहे विशाळ धरिले ।
तेणें करितां रचना चाले । सकळ सृष्टीची ॥ २२ ॥

ईश्वरें केवढें सूत्र केलें । सूर्यबिंब धावाया लाविलें ।
धुकटाकरवीं धरविलें । अगाध पाणी ॥ २३ ॥
पर्वताऐसे ढग उचलिती । सूर्यबिंबासी अच्छादिति ।
तेथें सवेंचि वायोची गती । प्रगट होये ॥ २४ ॥
झिडकझिडकुं धांवे वारा । जैसा काळाचा म्हणियारा ।
ढग मारुनी दिनकरा । मोकळे करी ॥ २५ ॥
बैसती विजांचे तडाखे । प्राणीमात्र अवचिता धाके ।
गगन कडकडून तडके । स्थळांवरी ॥ २६ ॥
येहलोकासी येक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत आळिलें ।
सकळां समभागें चालिलें । सृष्टिरचनेसी ॥ २७ ॥
ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसे कैंचें ।
विवरतां विवरतां मनाचे । फडके होती ॥ २८ ॥
ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना ।
अगाध महिमा चतुरानना । काये कळे ॥ २९ ॥
आवाहन विसर्जन । हें चि भजनाचें लक्षण ।
सकळ जाणती सज्जन । मी काय सांगों ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देहेक्षेत्रनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ २०.८

समास नववा : सूक्ष्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

मृतिकापूजन करावें । आणी सवेंचि विसर्जावें ।
हें मानेना स्वभावें । अंतःकर्णासी ॥ १ ॥
देव पूजावा आणी टाकावा । हें प्रशस्त न वटे जीवा ।
याचा विचार पाहावा । अंतर्यामीं ॥ २ ॥
देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाहीं ।
म्हणोनि याचा कांहीं । विचार पाहावा ॥ ३ ॥
देव नाना शरीरें धरितो । धरुनी मागुती सोडितो ।
तरी तो देव कैसा आहे तो । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥
नाना साधनें निरूपणें । देव शोधायाकारणें ।
सकळ आपुले अंतःकर्णें । समजलें पाहिजे ॥ ५ ॥
ब्रह्मज्ञानाचा उपाये । समजल्याविण देतां नये ।
पदार्थ आहे मा घे जाये । ऐसें म्हणावें ॥ ६ ॥
सगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रतक्ष भेटवावा देव ।
परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे ॥ ७ ॥
विचार पाहातां तगेना । त्यास देव ऐसें म्हणावेना ।
परंतु जन राहेना । काये करावें ॥ ८ ॥
थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करुनी पाहाती ।
तैसीच आहे हेहि गती । उपासनेची ॥ ९ ॥
थोर व्यापार ठाकेना जनीं । म्हणोनि केली रखतवानी ।
राजसंपदा तयाचेनी । प्राप्त कैची ॥ १० ॥
म्हणोनि जितुका भोळा भाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ।
अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैचा ॥ ११ ॥
अज्ञानासी ज्ञान न माने । ज्ञात्यास अनुमान न माने ।
म्हणोनि सिद्धांचीये खुणें । पावलें पाहिजे ॥ १२ ॥
माया सांडून मुळास जावें । तरीच समाधान पावावें ।
ऐसें न होतां भरंगळावें । भलतीकडे ॥ १३ ॥
माया उलंघायाकारणें । देवासी नाना उपाय करणें ।
अध्यात्मश्रवणपंथेंचि जाणें । प्रत्ययानें ॥ १४ ॥
ऐसें न करितां लोकिकीं । अवघीच होते चुकामुकी ।
स्थिति खरी आणि लटकी । ऐसी वोळखावी ॥ १५ ॥
खोट्याचे वाटे जाऊं नये । खोट्याची संगती धरूं नये ।
खोटें संग्रहीं करूं नये । कांहींयेक ॥ १६ ॥
खोटें तें खोटेंचि खोटें । खऱ्यासी तगेनात बालटें ।
मन अधोमुख उफराटें । केलें पाहिजे ॥ १७ ॥
अध्यात्मश्रवण करीत जावें । म्हणिजे सकळ कांहीं फावे ।
नाना प्रकारीचे गोवे । तुटोनी जाती ॥ १८ ॥
सूत गुंतलें तें उकलावें । तैसे मन उगवावें ।
मानत मानत घालावें । मुळाकडे ॥ १९ ॥
सकळ कांहीं कालवलें । त्या सकळाचें सकळ जालें ।
शरीरीं विभागले । सकळ कांहीं ॥ २० ॥
काये तें येथेंचि पाहावें । कैसें तें येथेंचि शोधावें ।
सूक्ष्माचीं चौदा नांवें । येथेंचि समजावी ॥ २१ ॥
निर्गुण निर्विकारी येक । तें सर्वां ठाई व्यापक ।
देह्यामधें तें निष्कळंक । आहे कीं नाहीं ॥ २२ ॥
मूळमाया संकल्परूप । तें अंतःकर्णाचें स्वरूप ।
जड चेतवी चैतन्यरूप । तें हि शरीरीं आहे ॥ २३ ॥
समानगुण गुणसाम्य । सूक्ष्म विचार तो अगम्य ।
सूक्ष्म साधु जाणते प्रणम्य । तया समस्तांसी ॥ २४ ॥
द्विधा भासतें शरीर । वामांग दक्षिणांग विचार ।
तोंचि अर्धनारीनटेश्वर । पिंडीं वोळखावा ॥ २५ ॥
तोचि प्रकृतिपुरुष जाणिजे । शिवशक्ती वोळखिजे ।
शडगुणईश्वर बोलिजे । तया कर्दमासी ॥ २६ ॥
तयासीच म्हणिजे महत्तत्व । जेथें त्रिगुणाचें गूढत्व ।
अर्धमात्रा शुद्धसत्व । गुणक्षोभिणा ॥ २७ ॥
त्रिगुणें चालतें शरीर । प्रतक्ष दिसतो विचार ।
मुळींच्या कर्दमाचें शरीर । ऐसें जाणावें ॥ २८ ॥
मन माया आणि जीव । हाहि दिसतो स्वभाव ।
चौदा नामांचा अभिप्राव । पिंडीं पाहावा ॥ २९ ॥
पिंड पडतां अवघेंचि जातें । परंतु परब्रह्म राहातें ।
शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सूक्ष्मनिरूपणनाम समास नववा ॥ ९ ॥ २०.९

समास दहावा : विमळब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

धरूं जातां धरितां न ये । टाकूं जातां टाकितां न ये ।
जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ॥ १ ॥

जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें ।
सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्या ॥ २॥
बैसलें माणूस उठोन गेलें । तेथें आकाशचि राहिलें ।
आकाश चहुंकडे पाहिलें । तरी सन्मुखचि आहे ॥ ३॥
जिकडेतिकडे प्राणी पळोन जातें । तिकडे आकाशचि भोवतें ।
बळें आकाशाबाहेर । कैसें जावें ॥ ४॥
जिकडेतिकडे प्राणी पाहे । तिकडे तें सन्मुखचि आहे ।
समस्तांचें मस्तकीं राहे । माध्यानीं मार्तंड जैसा ॥ ५॥
परी तो आहे येकदेसी । दृष्टांत न घडे वस्तुसी ।
कांहीं येक चमत्कारासी । देउनी पाहिलें ॥ ६॥
नाना तीर्थें नाना देसीं । कष्टत जावें पाहाव्यासी ।
तैसें न लगे परब्रह्मासी । बैसलें ठाईं ॥ ७॥
प्राणी बैसोनीच राहातां । अथवा बहुत पळोन जातां ।
परब्रह्म तें तत्वतां । समागमें ॥ ८॥
पक्षी अंतराळीं गेला । भोवतें आकाशचि तयाला ।
तैसे ब्रह्म प्राणीयाला । व्यापून आहे ॥ ९॥
परब्रह्म पोकळ घनदाट । ब्रह्म सेवटाचा सेवट ।
ज्यासी त्यासी ब्रह्म नीट । सर्वकाळ ॥ १०॥
दृश्या सबाहे अंतरीं । ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं ।
आरे त्या विमळाची सरी । कोणास द्यावी ॥ ११॥
वैकुंठकैळासस्वर्गलोकीं । इंद्रलोकीं चौदा लोकीं ।
पन्नगादिकपाताळलोकीं । तेथेंचि आहे ॥ १२॥
कासीपासून रामेश्वर । आवघें दाटलें अपार ।
परता परता पारावार । त्यास नाहीं ॥ १३॥
परब्रह्म तें येकलें । येकदांचि सकळांसी व्यापिलें ।
सकळांस स्पर्शोन राहिलें । सकळां ठाईं ॥ १४॥
परब्रह्म पाउसें भिजेना । अथवा चिखलानें भरेना ।
पुरामधें परी वाहेना । पुरासमागमें ॥ १५॥
येकसरें सन्मुक विमुख । वाम सव्य दोहिंकडे येक ।
आर्धऊर्ध प्राणी सकळीक । व्यापून आहे ॥ १६॥
आकाशाचा डोहो भरला । कदापी नाहीं उचंबळला ।
असंभाव्य पसरला । जिकडे तिकडे ॥ १७॥
येकजिनसि गगन उदास । जेथें नाहीं दृश्यभास ।
भासेंविण निराभास । परब्रह्म जाणावें ॥ १८॥
संतसाधुमाहानुभावां । देवदानवमानवां ।
ब्रह्म सकळांसी विसांवा । विश्रांतिठाव ॥ १९॥
कोणेकडे सेवटा जावें । कोणेकडे काये पाहावें ।
असंभाव्य तें नेमावें । काये म्हणोनी ॥ २०॥
स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कांहीं येकासारिखें नव्हे ।
ज्ञानदृष्टीविण नव्हे । समधान ॥ २१॥
पिंडब्रह्मांडनिरास । मग तें ब्रह्म निराभास ।
येथून तेथवरी अवकास । भकासरूप ॥ २२॥
ब्रह्म व्यापक हें तो खरें । दृश्य आहे तों हें उत्तरें ।
व्यापेंविण कोण्या प्रकारें । व्यापक म्हणावें ॥ २३॥
ब्रह्मासी शब्दचि लागेना । कल्पना कल्पूं शकेना ।
कल्पनेतीत निरंजना । विवेकें वोळखावें ॥ २४॥
शुद्ध सार श्रवण । शुद्ध प्रत्ययाचें मनन ।
विज्ञानी पावतां उन्मन । सहजचि होतें ॥ २५॥
जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ ।
निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ २६॥
हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्वांचा ।
साध्य होतां साधनाचा । ठाव नाहीं ॥ २७॥
स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें ।
सहजचि अनुर्वाच्य जालें । बोलतां न ये ॥ २८॥
ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेंसी बाणावें ।
जन्ममृत्याच्या नांवें । सुन्याकार ॥ २९॥
भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥ ३०॥
वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध ।
मनकर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥ ३१॥
वीस दशक दोनीसें समास । साधकें पाहावें सावकास ।
विवरतां विशेषाविशेष । कळों लागे ॥ ३२॥
ग्रंथाचें करावेंस्तवन । स्तवनाचें काये प्रयोजन ।
येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ॥ ३३॥
देहे तंव पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथींचा ।
आणी कवित्वप्रकार मनुशाचा । काशावरुनी ॥ ३४॥
सकळ करणें जगदीशाचें । आणी कवित्वचि काय मानुशाचें ।
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काये घ्यावें ॥ ३५॥
सकळ देह्याचा झाडा केला । तत्वसमुदाव उडाला ।
तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें ॥ ३६॥
ऐसीं हें विचाराचीं कामें । उगेंच भ्रमों नये भ्रमें ।
जगदेश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ॥ ३७॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
विमळब्रह्मनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ २०.१०
॥ दशक विसावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni

From http://sanskritdocuments.org .
The text is prepared by volunteers and is
to be used for personal study and research.
The file is not to be copied or reposted for
promotion of any website or individuals or for
commercial purpose without permission.
Help to maintain respect for volunteer spirit